राज्य मानवी हक्क आयोग
पोलीस कोठडी / न्यायालयीन कोठडी तसेच निरनिराळया शासकीय संस्था यामध्ये मृत्यू पावलेल्या ,बलात्कार झालेल्या प्रकरणाबाबतची माहिती पाठविणे.

महाराष्ट्र शासन,
गृह विभाग.

शासन परिपत्रक क्रमांक एचआरसी १३२००१/संकीर्ण ४५/ पोल १४,
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२, दिनांक :- ४ जुलै,२००१.

वाचा:- शासन परिपत्रक ,गृह विभाग क्रमांक एचआरसी १३२००१/संकीर्ण ४५/पोल १४,दिनांक १७ एप्रिल,२००१.

शासन परिपत्रक :-

मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३ मधील कलम २१ नुसार महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग स्थापन करणेत आला असल्याने पोलीस कोठडीत/ न्यायालयीन कोठडीत तसेच निरनिराळया शासकीय संस्था यामध्ये मृत्यू पावलेल्या,बलात्कार झालेल्या प्रकरणाबाबतची माहिती २४ तासाचे आता महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाला पाठविणेबाबत शासन परिपत्रक गृह विभाग क्रमांक एचआरसी १३२००१/संकर्ण ४५/ पोल १४,दिनांक १७ एप्रिल,२००१ अन्वये सर्व संबंधितांना निर्देश दिले आहेत.तथापि असे असतांनाही संबंधित प्राधिकारी अद्यापही असे अहवाल महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाला पाठवित नाहीत.असे शासनाचे निदर्शनास आले आहे.सबब सर्व प्राधिका-यांना असे अहवाल राज्य मानवी हक्क आयोगाला पाठविणेबाबत शासन पुनः आदेश देत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल याच्या आदेशानुसार व नावाने,

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी. 8 AUG 2001

१५५६५

(अ.ना. भोसले)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन ,गृह विभाग.

4.\C:\WINDOWS\Desktop\POL-5B\hrc 132001@45@ pol 14

प्रति,

विशेष कार्य अधिकारी ,राज्य मानवी हक्क आयोग,नवी मुंबई
महासंचालक व पोलीस महानिरीक्षक,महाराष्ट्र राज्य,मुंबई
पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई
कारागृह महानिरीक्षक,महाराष्ट्र राज्य,पुणे
सर्व पोलीस आयुक्त
पोलीस महानिरीक्षक (मानवी हक्क ) महाराष्ट्र राज्य,पुणे
सचिव,सामाजिक न्याय,कला ,क्रिडा व सांस्कृतिक कार्य विभाग,मंत्रालय
सचिव ,महिला व बालकल्याण विभाग,मंत्रालय,मुंबई
सर्व क्षेत्रीय पोलीस महानिरीक्षक
सर्व जिल्हादंडाधिकारी
सर्व पोलीस अधिक्षक
सर्व समादेशक,राज्य राखीव पोलीस बल